# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ९८/२०२४

**विषय :-** **दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :-** **महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयोग यांचे स्थायी आदेश क्र.रानिआ/रापनों-२०१७/ प्र.क्र.१४/का.११, दि.०६/०१/२०१८.**

उपरोक्त संदर्भीय स्थायी आदेशानुसार लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येतो. लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर जनजागृती करणे हा या पंधरवड्याचा उद्देश आहे. राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश प्राप्त झालेले आहेत. सदर आदेशामधील सर्व बाबी स्वयंस्पष्ट असून त्यानुसार सर्व संबंधितांनी या वर्षी दिनांक २६ जानेवारी, २०२४ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. (सोबत सदर आदेशाची प्रत जोडत आहे.)

**सोबत :-** **महाराष्ट्र शासन, राज्य निवडणूक आयोग यांचे स्थायी आदेश क्र.रानिआ/रापनों-२०१७/प्र.क्र.१४/ का.११, दि.०६/०१/२०१८.**

२४।१।२०२४

**( प्रा.(डॉ.) विजय खरे )**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/ 475
दिनांक : 24 JAN 2024

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२. मा.संचालक, सर्व प्रशाला
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालये
५. मा.संचालक, विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त सर्व संस्था

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

"लोकशाही पंधरवडा" साजरा करण्याबाबत-
"लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर
सर्वसामान्यांसाठी सतत शिक्षण देण्याकरिता...

## राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों -२०१७/प्र.क्र. १४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ६ जानेवारी, २०१८.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक (Sovereign, Socialist, Secular, Democratic Republic) देश असून, त्यांनी त्रिस्तरीय लोकशाही पध्दत स्वीकारली आहे. ही लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने सन १९९२ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना "स्वतंत्र स्थानिक शासन" म्हणून सांविधानिक मान्यता देण्यात आली असून त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या घेण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

२. लोकशाही बळकटीकरणासाठी जरी सर्व स्तरावर लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक असला तरीही गेल्या दोन दशकात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अनुभव लक्षात घेता अनेक मुद्द्यांवर आता कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे, उदा. :-

(i) देशाच्या विकास प्रक्रियेमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, स्थान व भूमिका अधोरेखित करणे.

(ii) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असल्याची जाणीव करून देणे.

(iii) लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि बळकटीकरण (Preservation, Protection & Strengthening) करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोग आणि शासनाबरोबरच सर्वांचीच आहे, याबाबत व्यापक कार्यक्रम हाती घेणे, इत्यादी.

३. वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २-३ वर्षांमध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचे व त्यांच्या निवडणुकांचे महत्व, याबाबत सर्व स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांना अवगत करणे.

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संशोधन करणे.

(iv) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जाद्वारे "१८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे", या आशयाचे प्रमाणपत्र घेणे;

(v) विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्रथम वर्षाच्या सर्व विषयांसाठी "लोकशाही, निवडणूक व सुशासन" हा विषय अनिवार्य करणे, इत्यादी.

४. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर एक राष्ट्रीय परिषद मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये "लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व लोकांना आवश्यक त्या सर्व विषयांवर सतत शिक्षणाद्वारे जागरुक करणे आवश्यक आहे" ही बाब दिसून आली. म्हणून "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर सर्व लोकांना सतत शिक्षण देण्यासाठी काही नवीन उपाययोजना करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आ दे श

(अ) राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा.

(ब) प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या सर्व शासकीय / निमशासकीय कार्यक्रमामध्ये मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व; निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी निर्भीडपणे काम करण्याची गरज; लोकशाही जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व लोकांनी जागरुक राहण्याची गरज, इत्यादी विषयांचा समावेश असावा.

(क) तसेच दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यक्रमांमध्ये व तसेच मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. ("ब" प्रमाणे) "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाचे बॅनर्स लावण्यात यावेत.

(ड) या कालावधीत (दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुववारी) सर्वांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर वरील विषयावर (लोकशाही, निवडणूक व सुशासन) जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी, उदा.-

(i) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या विषयावर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करावे.

(ii) सर्व उद्योग समूहांनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे.

(iii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी निवडणुकीच्या वेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुलामंच/खुलीचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित करावेत.

(iv) वृत्तपत्रे, मासिके यासारख्या छापील, सोशल मीडिया व स्थानिक केबल नेटवर्क यांचा वापर करून उपरोक्त कालावधीत ७३ व ७४ वी राज्य घटना दुरुस्ती, त्याअनुषंगाने निर्माण करण्यात आलेली लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत माहिती द्यावी.

(v) आवश्यक त्या ठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर्स, (टी.व्ही., रेडिओ, प्रेस, इत्यादी) लावणे.

(vi) सर्वांची मदत घेणे, उदा. रेस्टॉरन्ट/हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स, इत्यादी

५. पंधरवडा योग्य रितीने साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व विभागाच्या सचिवांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सर्व सूचना द्याव्यात.

६. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त; तसेच विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रुपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा होईल, याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. सचिव (सर्व विभाग)
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. सर्व विद्यापीठे
९. राज्य निवडणूक आयोगातील कार्यासने
१०. निवड नस्ती

---